महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे | Rs.2/-

शनिवार ❖ २८ सप्टेंबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - ०९५ ❖ पाने - ४

RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातीना केवळ ५००/- रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल; कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.

:: कार्यालय ::

९६१९१८८५५८ / ९१५८०७८६०१

E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com
news.thanejeevandeep@gmail.com

# भाजपा राष्ट्रीय अध्यक्षपदी महिला नेत्या?



**राष्ट्रीय स्वयंसेवस्क संघ हा भाजपची मातृसंस्था म्हटले जाते. जेपी नड्डा हे केंद्रात मंत्री झाल्यानंतर राष्ट्रीय अध्यक्षपदाची खुर्ची रिकामी झाली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने या पदासाठी एक महिला नेत्याचे नाव सुचवले असल्याचे समजते आहे.**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
☐ प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीत भाजप व त्याच्या मित्रपक्षांचे सरकार सत्तेत आले आहे. एनडीएचे सरकार सध्या केंद्रात स्थापन झाले आहे. त्यात भाजप हा सर्वात मोठा पक्ष आहे.

दरम्यान लोकसभा निवडणुकीनंतर भाजपने जेपी नड्डा यांना केंद्रीय मंत्री केल्याने भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची खुर्ची रिक्त झाली आहे. भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या चर्चेत अनेक नावे चर्चेत आहे. दरम्यान महाराष्ट्र भाजपचे नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नाव देखील चर्चेत होते. मात्र आता राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने भाजपच्या अध्यक्षपदासाठी एक महिलेचे नाव सुचवले असल्याचे समजते आहे.


राष्ट्रीय स्वयंसेवस्क संघ हा भाजपची मातृसंस्था म्हटले जाते. जेपी नड्डा हे केंद्रात मंत्री झाल्यानंतर राष्ट्रीय अध्यक्षपदाची खुर्ची रिकामी झाली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने या पदासाठी एक महिला नेत्याचे नाव सुचवले असल्याचे समजते आहे. राजस्थानच्या दोन वेळेस मुख्यमंत्री राहिलेल्या वसुंधरा राजे यांच्या नावासाठी संघाने पसंती दिल्याचे समजते आहे. त्यामुळे राजस्थानच्या राजकारणात चर्चा सुरू झाली आहे.

वसुंधरा राजे यांच्यासोबत संजय जोशी यांचे नाव देखील संघाकडून पुढे करण्यात येत आहे. तर मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री आणि विद्यमान केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान यांचे नाव पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांनी पुढे केल्याची चर्चा आहे. मात्र राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून केवळ वसुंधरा राजे यांचे नाव पुढे केले गेले आहे. त्यामुळे आता भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी कोणाची वर्णी लागणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

वसुंधरा राजे या दोन वेळेस राजस्थानच्या मुख्यमंत्री राहिलेल्या आहेत. २००३ ते २००८ आणि २०१३ ते २०१८ या कालावधीत त्या मुख्यमंत्री होत्या. वसुंधरा राजे यांनी केंद्रात देखील काही महत्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. सध्या त्यांच्याकडे भाजपच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदाची जबाबदारी आहे. वसुंधरा पान ४ वर ▶▶

# नर्सरीसाठी निधी नाही?

## जिल्हा परिषदेच्या नर्सरी वर्गाना घरघर



**शिक्षकांचे भविष्य अंधारमय**

**मंत्रालयातूनही प्रतिसाद नाही**

**शिक्षण खात्यातील हफ्तेखोरीमुळे तक्रारींना केराची टोपली**

**अनुदान बंद झाल्याने वर्ग बंद करण्याची नामुष्की**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
☐ प्रतिनिधी


जिल्हा परिषद शाळांतील सातत्याने घटत्या विद्यार्थी संख्येवर प्रभावी पर्याय काढण्यासाठी प्रायोगिक तत्वावर तत्कालीन ठाणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष कपिल पाटील व उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव यांच्या प्रयत्नांतून सन २०१० साली इंग्रजी नर्सरी वर्ग सुरू करण्यात आले होते. नियुक्त शिक्षकाच्या मेहनतीवर विश्वास ठेवून पालक वगनि खासगी शाळेतून विद्यार्थ्यांची सोडचिठ्ठी करून जिल्हा परिषदेच्या या नवीन नर्सरी वर्गांना पसंती दिली आणि अल्पावधीतच जिल्हा परिषद शाळेच्या पटसंख्येचे गत वैभव दुप्पटी प्राप्त झाले. त्यामुळे हा शैक्षणिक प्रयोग यशस्वी ठरून एकेकाळ ऐकू येणारा जिल्हा परिषद शाळा पान ४ वर ▶▶

# वाढवण बंदराजवळ रिलायन्सचं टेक्सटाईल पार्क

## — एमआयडीसीच्या सक्रिय हालचाली —

**जमिनीच्या मागणीसाठी रिलायन्सचा एमआयडीसीसोबत पत्रव्यवहार**

**८८० एकर जमीनीवर उभे राहणार टेक्सटाईल पार्क**



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर** : पालघरमध्ये प्रस्तावित वाढवण बंदराजवळ माहीम व टोकराळे परिसरातील महसूल विभागाच्या ताब्यात असणाऱ्या ८८० एकर जमिनीचे पास थू पद्धतीनं महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून भूसंपादन करण्यात आलं होतं. एमआयडीसीच्यावतीनं ही जमीन रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडला टेक्स्टाईल पार्कसाठी दिली जाण्याची शक्यता आहे. एमआयडीसीकडून त्याबाबतचा अर्ज पालघरच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आल्याची माहिती आहे.प्रस्तावित वाढवण बंदराजवळ रिलायन्सच्या टेक्स्टाईल पार्कबाबत ६ सप्टेंबर अन् ११ सप्टेंबरला राज्याच्या उपमुख्यमंत्री कार्यालयात बैठक झाल्याची माहिती आहे.

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड कंपनीच्यावतीनं टेक्स्टाईल पार्कच्या उभारणीसाठी जमिनीच्या मागणीसाठी एमआयडीसीकडे पत्रव्यवहार केल्याची माहिती आहे. या संदर्भात १६ सप्टेंबर व २१ सप्टेंबरला पत्र पान ४ वर ▶▶



# खाडीकिनाऱ्याच्या विकासासाठी १५० कोटी मंजूर

**वरसावे ते घोडबंदर खाडी किनाऱ्याला पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करण्याचा आराखडा पालिकेकडून तयार**

**पर्यटकांसाठी प्रशस्त पाथ वे, आकर्षक गार्डन्स, विसर्जन घाट, मुलांना खेळण्यासाठी जागा, बसण्यासाठी आसने**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर** : मिरा-भाईंदर महापालिका हद्दीतील वरसावे उड्डाणपूल ते घोडबंदर किल्ल्यापर्यंतच्या सुमारे २ किलोमीटरपर्यंत विस्तारलेल्या खाडी किनाऱ्याचा विकास वॉटर फ्रंट डेव्हलपमेंटच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. त्यासाठी राज्य शासनाने या कामाच्या पहिल्या टप्प्याकरीता तब्बल १५० कोटींचा निधी मंजूर केला आहे.

या कामाला पुढील महिन्यापासून सुरुवात होणार असून आहे. या कामाच्या पहिल्या टप्प्यात सुमारे २ किलोमीटरपर्यंत लांब वॉटर फ्रंट डेव्हलपमेंट म्हणजेच खाडी किनाऱ्याचा सुनियोजित पद्धतीने विकास केला जाणार आहे. पालिकेकडून या कामाचे डिझाईन, संकल्पचित्र तयार करण्यात आले होते. त्यानुसार मिरा-भाईंदर शहराला लाभलेल्या या खाडी किनाऱ्याचा नियोजनबद्ध पद्धतीने वॉटर फ्रंट डेव्हलपमेंट करण्याची मागणी सरनाईक यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली होती.

पालिका हद्दीतील वरसावे ब्रिज ते घोडबंदर किल्ल्यादरम्यान सुमारे १.८ किमी पर्यत खाडी किनारा आहे. परदेशात जसे वॉटर फ्रंट डेव्हलपमेंटच्या माध्यमातून तेथील परिसर सुशोभित केला जातो. त्या धर्तीवर येथील खाडी किनारा विकसित करण्यात येणार आहे. याचप्रमाणे गुजरात राज्यात देखील साबरमती रिव्हरफ्रंट डेव्हलपमेंट संकल्पना राबविण्यात आली आहे. त्याप्रमाणे घोडबंदर खाडी किनाऱ्याच्या विकासाची संकल्पना राबविण्यात येणार आहे.

या कामातील पहिल्या टप्प्याचा खर्च १५० पान ४ वर ▶▶

# कायद्याची जरब फक्त कागदावरच

**अन्न व औषध प्रशासनाचे ढिसाळ नियंत्रण**

**रुग्णांच्या पोटात भेसळयुक्त औषध**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : स्थापनेपासूनच मनुष्यबळाची बोंब असणाऱ्या राज्य शासनाच्या अन्न आणि औषध प्रशासनाच्या कारभार कायमच चर्चेत असतो. ग्राहकांना सुरक्षित, दर्जेदार अन्नाचा पुरवठा करण्यासाठी सबळ कायदे असले तरी त्याची अंमलबजावणी करण्यासाठी अन्न प्रशासनाच्या मनुष्यबळाचे हात त्यांच्याच यंत्रणेने बांधले आहेत. कोट्यवधी रुपयांचा महसूल देणाऱ्या आणि कोरोनानंतर वेगाने फोफावणाऱ्या खाद्य पदार्थ विक्रीच्या व्यवसायाला कायद्याची पान ४ वर ▶▶




जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A. | B.Com. | B.Sc. CHEMISTRY | B.Sc. MATHS | BAF | BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY | M.Com. ADVANCED ACCOUNTANCY | M.A. MARATHI | M.A. ECONOMICS | M.A. SOCIOLOGY | M.A. HISTORY
Look forward to a BRIGHTER FUTURE
7719814142
9130580111

# तीनवेळा इशारा देऊनही अधिकाऱ्यांच्या बदल्या का रोखल्या?

## निवडणूक आयोगाने महाराष्ट्र सरकारला झापलं

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
☐ प्रतिनिधी

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने तायरीला वेग आला आहे. निवडणूक आयोगाचे अधिकारी महाराष्ट्र दौऱ्यावर आले आहेत. निवडणूक आयोगाने महाराष्ट्र सरकारला झापलं आहे. तीनदा वॉर्निंग देऊनही अधिकाऱ्यांच्या बदल्या का थांबवल्या? असा सवाल निवडणूक आयोगाने महाराष्ट्र सरकारला विचारला आहे.




निवडणूक अधिकाऱ्यांनी CEO, SPNO, नोडल ऑफिसर आणि CPMF अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. केंद्रीय निवडणूक आयोगाच महाराष्ट्राच्या मुख्य सचिवांना पत्र पाठवले आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अधिकाऱ्यांच्या बदल्या बाबत केलेल्या सूचनांचा अहवाल न दिल्याने निवडणूक आयोगाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्रसह निवडणुका होणाऱ्या इतर चार राज्यांच्या मुख्य सचिवांना पत्र लिहले होते. एकाच जागी तीन वर्षापेक्षा जास्त काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याच्या सूचना दिल्या होत्या. पण आयोगाच्या पत्राकडे दुर्लक्ष केल्याने आयोगाने नाराजी दर्शवली आहे. दिलेल्या कालावधीत या सगळ्याची माहिती का दिली नाही हे स्पष्ट करण्याचे निर्देश केंद्रीय निवडणूक आयोगाने दिले आहेत. तीन वेळा स्मरणपत्र पाठवूनही राज्य सरकारकडून कुठलही उत्तर आलेले नाही. यामुळे केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्र सरकारवर ताशेरे ओढले आहेत.

या दौऱ्यादरम्यान निवडणूक आयोग राजकीय पक्षासोबत देखील बैठक घेतली. पान ४ वर ▶▶

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B-Grade) प्राप्त
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT / CS)
UNDER GRADUATE: B.Sc. Data Science | B.Sc. I.T. | B.Sc. CHEMISTRY MATHS | B.M.S. | B.A.F. | BAMMC | B.Com. | B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT | M.Sc. CHEMISTRY | M.Com. ADVANCED ACCOUNTANCY | M.A. MARATHI | M.A. HISTORY | M.A. ECONOMICS | M.A. SOCIOLOGY | M.A. GEOGRAPHY | M.A. C&J
Look forward to a BRIGHTER FUTURE
8108559566
9619188558

# व्यावसायिक इंधन वापरणा-या आस्थापनांनी जैविक इंधनाचा वापर करा

## - केडीएमसीचे आवाहन




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ (प्रतिनिधी) -**

कल्याण : महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने पर्यावरण संवर्धन व वायु प्रदूषण टाळण्याकरीता कल्याण डोंबिवली महानगरपालिका परीक्षेत्रात असलेल्या हॉटेल्स, रेस्टॉरंट, ढाबे , बेकरीज, तंदुर हॉटेल्स, ओपन रेस्टॉरंट यांनी दैनंदिन वापरामध्ये व्यावसाईक इंधनाऐवजी (लाकुड, कोळसा) जैविक इंधन (एलपीजी, इलेक्ट्रीसिटी) चा वापर करण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार ज्या आस्थापना अद्यापही दैनंदिन वापरामध्ये जैविक इंधनाऐवजी व्यावसायिक इंधन वापरत आहेत, अशा आस्थापनांना बाजार व परवाना विभागामार्फत नोटिसा देण्यात आलेल्या आहेत.

महानगरपालिका परीक्षेत्रात असलेल्या हॉटेल्स, रेस्टॉरंट, ढाबे, बेकरीज, तंदुर हॉटेल्स, ओपन रेस्टॉरंट हे त्यांच्या दैनंदिन व्यवसायात लाकुड व कोळशाचा वापर करत आहेत, अशा आस्थापनांचे सर्वेक्षण करण्यात येत असून कल्याण परीक्षेत्रात निलकमल, गरीब नवाज, मदिना, हुसैन आणि सागर बेकरी हे लाकुड व कोळशाचा वापर करीत आहेत. तर विहार व फाईनडाईन हॉटेल यांना तंदुर बनविताना कोळशाचा वापर करीत असून महा पालिकेचा परवाना न घेता व्यवसाय करीत असल्याने त्यांना नोटिसा देण्यात आल्या आहेत. तर डोंबिवली परीक्षेत्रातील श्रीकृष्ण बेकरी, रूबीना बेकरी यांना देखील नोटिसा बजाविण्यात आल्या आहेत.

ज्या आस्थापना व्यवसायिक इंधन वापरत आहेत, अशा आस्थापनांनी तातडीने त्यांच्या दैनंदिन व्यवसायात जैविक इंधनाचा वापर आगामी १५ ते २० दिवसात सुरु करावा, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी केले आहे. अन्यथा या आस्थापनांवर महापालिकेच्या बाजार व परवाना विभागामार्फत सिल करण्याची कारवाई करण्यात येईल, अशी माहिती बाजार व परवाना विभागाचे सहा. आयुक्त प्रसाद ठाकुर यांनी दिली आहे.

### दिव्यांग व मतिमंद व्यक्तींसाठी केडीएमसीतर्फे

# फिजोओथेरेपी व बहुविद्याशाखीय थेरेपी सुविधा विनामूल्य उपलब्ध



कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडे सुमारे ५,५०० दिव्यांग व्यक्तींनी आपली नोंद केलेली आहे. या दिव्यांग व्यक्तींसाठी आतापर्यंत महापालिकेमार्फत फिजीओथेरेपीची कोठलेही सुविधा विनामुल्य स्वरुपात उपलब्ध नव्हती. त्यामुळे पालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी या बाबीची दखल घेवुन, आता महापालिकेकडे नोंदणीकृत असलेल्या दिव्यांग आणि मतिमंद व्यक्तींना ही सुविधा विनामुल्य उपलब्ध व्हावी, या दृष्टिकोनातून समाज विकास विभागाने काढलेल्या निविदेला महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी मंजुरी दिली असून, या कामाचे कार्यादेश 'आधार रिहॅबिलेटेड सर्विसेस' यांना देण्यात आले आहेत.

यामुळे क प्रभाग कार्यालया शेजारी असलेल्या महिला कल्याण केंद्राच्या वास्तुमधील तळमजल्यावर हि सुविधा संबंधित लाभार्थ्यांना उपलब्ध होणार आहे. सदयस्थितीत ही सुविधा ३ वर्षासाठी उपलब्ध राहणार असून, त्याकरिता रूपये ४ कोटी ७५ हजार इतका खर्च अपेक्षित आहे, अशी माहिती महापालिकेच्या समाज विकास विभागाचे उपायुक्त संजय जाधव यांनी दिली आहे.

या केंद्रांमध्ये वैद्यकीय सल्ला, ऑर्थोपेडिक सल्ला, न्यूरोलॉजिकल सल्ला, आयुर्वेदिक सल्ला, होमिओपॅथिक सल्ला, मानसशास्त्रीय समुपदेशन त्याचप्रमाणे फिजिओथेरपी, शारीरिक उपचार, व्यावसायिक थेरपी, स्पीच थेरपी, दैनंदिन जीवनातील क्रियाकलाप, हस्तक्षेपात्मक शिक्षण क्रियाकलाप, योग आणि ध्यान, केअरगिव्हर्सना वैयक्तिकृत प्रशिक्षण आणि समुपदेशन हे सर्व विनामुल्य स्वरुपात उपलब्ध होणार आहेत.

या उपचारांमुळे व्याधीग्रस्त नागरीकांना, दिव्यांगाना त्यांच्या उपचारांसाठी फिजिओथेरपीसाठी महापालिका क्षेत्राबाहेर ठाणे व मुंबई येथे जावे लागणार नाही. महापालिका दिव्यांगासाठी करीत असलेल्या या सोयीसुविधेमुळे दिव्यांग व्यक्तींना नवसंजिवनी प्राप्त होवून, त्यांचे जीवन अधिक गतीमान व आनंदी होण्यास मदत होईल.

# कल्याणच्या राधानगर परिसरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न तातडीने सोडवा

## - माजी आमदार नरेंद्र पवार यांच्या ट्रॅफिक पोलिसांना सूचना



कल्याण : कल्याण पश्चिमेच्या खडकपाडा परिसरातील राधानगर भागात गेल्या काही महिन्यांपासून मोठ्या प्रमाणात होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. ही वाहतूक कोंडी फोडण्यासाठी तातडीने उपाय योजना करण्यासह पी १- पी२ सारखे पार्किंग धोरण राबविण्याची सूचना माजी आमदार नरेंद्र पवार यांनी केली आहे. भारतीय जनता पक्षाच्या सरचिटणीस साधना गायकर यांच्या कार्यालयात वाहतूक पोलिसांसोबत झालेल्या बैठकीत पवार यांनी या सूचना केल्या आहेत.

कल्याण पश्चिमेतील खडकपाडा परिसर आणि यामध्ये येणाऱ्या राधा नगर हा नव्या कल्याणचा महत्त्वाचा भाग आहे. विशेष म्हणजे या एकाच परिसरात ३ मोठी रुग्णालये, शाळा, डान्स स्कूल आदींसह मोठी बाजारपेठही आहे. परिणामी इथल्या मुख्य रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात होणाऱ्या वाहनांचे पार्किंग वाहतूक कोंडीला कारणीभूत ठरत आहे. परिणामी स्थानिक नागरिकांना आणि इथल्या व्यापाऱ्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

यासंदर्भात स्थानिक नागरिक आणि व्यापाऱ्यांनी भाजप सरचिटणीस साधना गायकर यांच्याकडे वारंवार तक्रारी केल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर माजी आमदार नरेंद्र पवार यांच्या पुढाकाराने साधना गायकर यांच्या कार्यालयात वाहतूक पोलिसांच्या अधिकाऱ्यांची एक महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. ज्यामध्ये या परिसरातील वाहतूक कोंडीवर लवकरात लवकर ठोस

### पी१– पी २ पार्किंग धोरण राबविण्याची आग्रही भूमिका

उपाय योजना करण्याची आग्रही मागणी माजी आमदार पवार यांनी यावेळी केली. तसेच वाहनांच्या पार्किंगसंदर्भात पी१-पी२ सारखे धोरण राबविण्याची सूचना करत तातडीने ही वाहतूक कोंडी फोडण्याची सूचना केली. तर नागरिकांची समस्या जाणून घेत त्यासाठी बैठक लावल्याबद्दल स्थानिक नागरिक आणि व्यापाऱ्यांनी माजी आमदार नरेंद्र पवार आणि सरचिटणीस साधना गायकर यांचे विशेष आभार मानले.या बैठकीला माजी परिवहन सदस्य तथा कल्याण पश्चिम विधानसभा संयोजक स्वप्निल काटे, भाजपा वॉर्ड अध्यक्ष सुनिल चव्हाण, प्रविण देशपांडे, राजेश लिंबाचिया, सच्चिदानंद दुबे, उमेश झुंजारराव, सुभाष वाणी, सतीश त्रिपाठी, पल्लवी खंडागळे, सुमित शाह, श्रीकांत शेळके आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, व्यावसायिक व नागरिक उपस्थित होते.



## मुरबाड नगरपंचायत, मुरबाड

मु.पो.ता.मुरबाड, जि.ठाणे-४२१४०१. फोन नं. ०२५२४-२२५९०५ ईमेल-mnpmurbad@gmail.com

### ई- फेर निविदा सुचना क्र. ०५ सन २०२४-२५

मुरबाड नगरपंचायत, मुरबाड ता. मुरबाड, जि. ठाणे. बांधकाम विभागाच्या 'राज्य सरोवर संवर्धन योजनेंतर्गत सन-२०२३-२४' या योजनेंतर्गत ०१ कामांची निविदा नगर पंचायत मुरबाडकडून मागविण्यात येत आहे. कामा संबंधी सविस्तर तपशील mahatenders.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
तरी सदर निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.

शिक्का

जा.क्र./मुनप/बांधकाम विभाग/१८९७/२०२४
दि.२६/०९/२०२४

सही/-
(मनोज ज. म्हसे)
मुख्याधिकारी, नगरपंचायत मुरबाड


# आमदार किसन कथोरेंच्या नेतृत्वाखाली शिरगाव आणि कोंडेसाखरे ग्रामस्थांचा भाजपात प्रवेश



मुरबाड : मुरबाड विधानसभेचे कार्यक्षम आमदार किसन कथोरे यांच्या नेतृत्वावर व विकास कामांवर प्रभावित होऊन कुडवली जिल्हा परिषद गटातील शिरगाव व कोंडेसाखरे ग्रामस्थांनी भाजपा मध्ये जाहीर प्रवेश केला आहे. मागिल काही दिवसांपासून तालुक्यातील मोठ्या संख्येने कार्यकर्ते भाजपात दाखल होत आहेत. याचा फायदा निश्चिच येणारय़ा विधानसभा व ईतर निवडणूकीत भाजपाल ा होणार असल्याचे आमदार कथोरे यांनी सांगितले. कोंडेसाखरे येथील ग्रामस्थांना आणण्यासाठी भाजपा कामगार आघाडीचे संतोष पवार यांनी विशेष मेहनत घेतली तर शिरगाव येथिल ग्रामस्थांसाठि दिलीप भावार्थे यांनी पुढाकार घेतला. यावेळी सरचिटणीस नितीन मोहपे, दिपक पवार, सुरेश बांगर, मोहन सासे,जयवंत कराळे, सचिन चौधरी, मनोज सासे, नरेश मोरे उपस्थित होते.

# राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा करुन केले वृक्षारोपण




वासिंद : येथील समाजहितकारिणी संस्था संचलित उत्कर्ष कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा करुन या निमित्ताने महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) स्थापनेच्या निमित्ताने उत्कर्ष महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा करण्यात आला. यामध्ये श्रम आणि संस्कार यांचे महत्त्व समाजाला पटवून देण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना महत्त्वपूर्ण काम करीत आहे. आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवून आणण्यासाठी विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी व्हावे असे आवाहन प्राचार्य प्रा. डॉ. शेषराव मसूडकर यांनी केले. यावेळी उपप्राचार्य अजित पोटे, प्राध्यापिका दिपिका बिडवी, प्रा. भारती सोपणार यांनी राष्ट्रीय सेवा योजना दिनाचे महत्व पटवून दिले. या कार्यक्रमावेळी प्राध्यापक संदीप पवार, प्रा. दीपाली बोद्रे, प्रा. वृषाली तरणे, प्रा. उषा शेलार, प्रा. प्राजक्ता खरे, प्रा. दर्शना निचिते, प्रा. स्वप्नाली साळवे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकल्प अधिकारी प्राध्यापक नितीन वेखंडे, सुत्रसंचालन दीपिका बिडवी यांनी तर प्रा. नितीन वेखंडे यांनी आभारप्रदर्शन मानले.

# निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आंतरजिल्हा सीमाभागातील काटेकोर तपासणी सुरू

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ (प्रतिनिधी) -**

पेण : आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये रायगड, पुणे, सातारा, रत्नागिरी, सोलापूर जिल्हा प्रशासनाने आंतरजिल्हा सीमा चौक्यांना अधिक मजबुती देण्याचा निर्णय आज आयोजित आंतर जिल्हा बैठकीत घेण्यात आला आहे.

आगामी विधानसभा सभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर सीमेलगतच्या जिल्हा क्षेत्रात आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमल बजावणी करण्याच्या अनुषंगाने रायगड, पुणे, सातारा, रत्नागिरी, सोलापूर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला जिल्हाधिकारी रायगड किशन जावळे, पुणे जिल्हाधिकारी सुहास दिवसें, सातारा जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, सोलापूर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, रायगड पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, पुणे पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, सातारा पोलीस अधिक्षक समीर शेख यांसह राज्य उत्पादन शुल्क विभागाचे सर्व प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

निवडणूक कालावधीत आदर्श आचारसंहितेची काटेकोरपणे अंमल बजावणी करणे आवश्यक आहे. यासाठी कायमस्वरुपी चेकपोस्ट सोबतच सीमेवर तात्पुरत्या चेकपोस्टची स्थापना करणे आवश्यक आहे. सर्व जिल्ह्यानी या कामासाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करुन द्यावे असे यावेळी निश्चित करण्यात आले. निवडणुकीवर परिणाम होऊ शकणाऱ्या चलन, मद्य आणि इतर वस्तूंची अवैध वाहतूक रोखण्यासाठी विशेष दक्षता घेण्यासाठी प्रभावी उपाययोजन करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

निवडणुकीवर प्रभाव टाकण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या कोणत्याही मालाची वाहतूक करण्यासाठी सामान्यतः वापरल्या जाणाऱ्या ट्रकच्या हालचालींवर लक्ष ठेवून त्यावर कारवाई करण्याचा निर्णय उपस्थित अधिकाऱ्यांनी घेतला. निवडणूक आदर्श आचारसंहितेचे कोणतेही उल्लंघन होणार नाही याची खात्री करण्यासाठी शेजारच्या राज्यातील व शेजारील जिल्ह्यांच्या अधिकाऱ्यांनी संपूर्ण समन्वयासाठी सहमती दर्शवली. ग्रामीण भागात तसेच सागरी मार्गाने होणाया वाहतुकीची प्रत्येक टप्प्यावर कसून तपासणी करण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला. सर्व सीमा भागात प्रमुख रस्त्यांसह आतील लहान मार्गावर बारकाईने लक्ष ठेवण्याची आवश्यकता असल्याचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी नमूद केले.

सहभागी सर्व जिल्हाधिकारी यांनी लोकसभा निवडणूक आचार संहिता काळात केलेल्या उपाययोजना आणि विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने केलेल्या पूर्व तयारीची माहिती सादर केली. यावेळी सीमाभागातील सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी, पोलीस आणि जिल्हा प्रशासनातील संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## प्रथम पुण्यस्मरण



**स्व. संतोष जाधव**

'तुमचं असणं सर्व काही होतं,
आयुष्यातील ते सुंदर पर्व होतं..
आज सर्व काही असल्याची
जाणीव आहे, पण तुमचं नसणं,
हीच मोठी उणीव आहे,
सहवास जरी सुटला स्मृति
सुगंध देत राहील,
आयुष्याच्या प्रत्येक वळणावर
आठवण तुझी येत राहिल'

|| भावपूर्ण श्रद्धांजली ||
**समस्त जाधव परिवार**

## आमच्या वर्गावर ठेवा

साहेब तुम्ही गाजावाजा केला
ई लर्निंग सुरु केलं
विज बिल थकल्यावर
मिटर काढून नेलं
अशा वेळी तुम्हीच सांगा
कोणावर ठोकावा दावा?
आमच्या गुरुजीला फक्त
आमच्या वर्गावर ठेवा

खेड्यात कुठली आली विज ?
आपला खडू फळाच बरा
चैतन्याचा चैतन्याशी
वाहत राहतो झरा
गुरुचा शिष्याला आता
तुम्हीच लळा लावा
आमच्या गुरुजीला फक्त
आमच्या वर्गावर ठेवा

साहेब तंत्रज्ञान नवे आले
आले थ्रिजी फोर जी
त्यावर सगळ्यात भारी
असतात आमचे गुरुजी
त्यांच्या हातून ज्ञानाची
अखंड घडू द्या सेवा
आमच्या गुरुजीला फक्त
आमच्या वर्गावर ठेवा

# आरटीओ कर्मचारी संघटनेचा बेमुदत संप स्थगित

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ (प्रतिनिधी) -**

कल्याण : आरटीओ कर्मचारी संघटनेने कर्मचा-यांच्या जिव्हाळयाच्या मागण्यासांठी २४ सप्टेंबर पासून बेमुदत संप आंदोलन चालू केले होते. गुरुवारी परिवहन आयुक्त कार्यालयात सर्व मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाली. या चर्चेत संघटनेच्या मागणीनुसार ३० नोव्हेंबर २०२४ पर्यंत वरिष्ठ लिपिक ते कार्यालय अधिक्षक पदांचे सेवाप्रवेश नियम अंतिम करण्यात येतील. तो पर्यंत पात्र कर्मचा-यांना तदर्थ पदोन्नती देण्यात येईल असे स्पष्ट आश्वासन केले.

महसुल विभागानूसार बदल्या करण्याचे धोरण रद्द करण्यात आले असून पूर्वीप्रमाणेच बदलीकरिता पूर्वीप्रमाणेच १५ विभागातंर्गतच बदल्या करण्याचेही मान्य केले. प्रशासनाने इतर मागण्यांवरही सकारात्मक निर्णय घेण्याचेही मान्य केले. त्यानुसार बेमुदत संप स्थगित करण्यात आला आहे. प्रशासनाने कर्मचा-यांच्या जिव्हाळयाच्या मागण्या मान्य करण्यात आल्याने संघटनेच्या वतीने सरचिटणीस सुरेंद्र सरतापे यांनी पुष्पगुच्छ देऊन आभार मानले, आणि अशाच त-हेने सहकार्य करण्याची अपेक्षा यावेळी व्यक्त केली.

## महाड तालुका मराठा समाज सेवा संघाच्या वतीने विद्यार्थ्यांचा गुणगौरव

कल्याण : महाड तालुका मराठा समाज सेवा संघ, कल्याण तर्फे सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात समाजातील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ रविवार, २९ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. पूर्वेकडील मराठा कोळसेवाडी येथे संध्याकाळी पाच वाजता होणाऱ्या या समारंभाला अध्यक्ष म्हणून दत्तात्रय साळुंखे उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांतर्फे देण्यात आली.

# केळंबा देविच्या नवरात्र उत्सवाची तयारी जोरात

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ (प्रतिनिधी) -**



पेण : दरवर्षीप्रमाणे यावर्षीही पेण तालुक्यातील खरोशी येथील माऊली कळंबा मातेचा नवरात्र उत्सव ३ ऑक्टोबर पासून सुरू होत असून त्या नवरात्र उत्सवाची जय्यत तयारी गावकरी बंधू करत असताना दिसून येत आहेत. चारशे वर्षांपूर्वीचा इतिहास असलेल्या तुमच्या आमच्या हाकेला धावणारी नवसाला पावणारी जागृत देवस्थान आणि केळीच्या झाडातून प्रकट झालेल्या केळंबा मातेचा नवरात्र उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात येतो. नवरात्रीचे नऊ दिवस लाखो भाविक माऊलीच्या दर्शनासाठी येत असतात गावकरी बंधू या क्षणाच्या आतुरतेने वाट पाहताना दिसून येतात या नवरात्रीच्या नऊ दिवसांमध्ये येणाऱ्या जाणाऱ्या सर्व भाविक भक्तांना चहा पाण्याची व्यवस्था त्यांच्या बसण्याची व्यवस्था रांगेत येण्याची , जाण्याची व्यवस्था अतिशय उत्तमपणे गावकरी बंधू करताना दिसून येत असतात नवरात्र उत्सवाची तयारी म्हणून संपूर्ण गावातील पुरुष महिला तरुण माऊलीच्या पायथ्यापासून ते खरोशी फाट्यापर्यंत परिसर स्वच्छता रस्त्याची डागडुजी त्याचबरोबर आजूबाजूचा निसर्गरम्य परिसर स्वच्छ आणि सुंदर दिसावा यासाठी स्वच्छता अभियानाच्या माध्यमातून

### गावकऱ्यांनी केली परिसर स्वच्छता

आज गावकरी बंधू एकत्र येऊन संपूर्ण परिसर स्वच्छ केला खरं सांगायचं तर या नवरात्रीच्या नऊ दिवसांमध्ये गावकरी बंधू एक दिलाने एकोपाने राहून माऊलीचा नवरात्र उत्सव आनंदाने साजरा करताना दिसत आहेत यावर्षी पाटील बंधू यांची पाळी असल्यामुळे घरत बंधू आणि वरचीआळी पाटील बंधू हे उत्तमपणे देवीचा पहारा आणि रस्त्यावरील वाहतूक यांचं योग्य नियोजन करून आलेल्या सर्व भाविकांना उत्तम सेवा कशी देता येईल त्यांचे खास नियोजन करून गावकरी बंधू त्याचबरोबर गाव पंच अतिशय प्रामाणिकपणे ही सेवा करताना दिसून येत आहेत.




२८ सप्टेंबर २०२४
शनिवार

**मेष**
तुम्ही एखाद्या गोष्टीबद्दल थोडे गोंधळलेले असाल, खास मित्रासोबत शेअर केल्यास तुम्हाला आराम मिळेल. कुटुंबासमवेत चित्रपटात फिरण्याचा बेत आखता येईल.

**वृषभ**
महिलांसाठी आजचा दिवस अतिशय अनुकूल आहे. विद्यार्थ्यांना यश मिळण्याची शक्यता आहे, परंतु अभ्यासात अधिक मेहनत करावी लागेल.

**मिथुन**
निर्णय घेण्यासाठी दिवस चांगला आहे. नवीन बिझनेस डीलसाठी ऑफर मिळेल. तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत घरगुती कामे पूर्ण करण्यात व्यस्त असाल.

**कर्क**
तुम्ही नवीन वाहन खरेदी करण्याचा निर्णय घेऊ शकता. ऑफिस मध्ये कामाचा ताण वाढू शकतो. ज्यासाठी तुम्हाला ओव्हरटाईम करावा लागेल.

**सिंह**
तुमच्या कुटुंबातील सदस्यांसोबत चांगला वेळ घालवायला मिळेल, ज्यामुळे कौटुंबिक वातावरण आनंददायी राहील. ऑफिस मधील सहकाऱ्यांचे सहकार्य मिळेल.

**कन्या**
वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दिवस चांगला आहे. काही दिवसांपासून सुरू असलेला वाद आज संपुष्टत येईल.महिलांसाठी दिवस उत्तम राहील.

**तूळ**
पैशाच्या बाबतीत निष्काळजी राहू नका. आर्थिक बाबतीत तुम्ही एखाद्या तज्ञाचा सल्ला घ्याल, हा सल्ला उपयुक्त ठरेल. प्रलंबित कामे वेळेवर पूर्ण कराल.

**वृश्चिक**
आधीच अस्तित्वात असलेल्या समस्यांचे समाधान मिळेल, ज्यामुळे तुमचे मन प्रसन्न राहील. कुटुंबात धार्मिक कार्याचे नियोजन करता येईल.

**धनु**
व्यावसायिक आज महत्त्वाच्या बैठकीला उपस्थित राहू शकतात. आज तुम्हाला एखाद्याकडून पैसे उधार घेण्यापासून आराम मिळेल, तणाव कमी होईल.

**मकर**
सरकारी कामात तुम्हाला मोठा फायदा होण्याची शक्यता आहे. आज मुलांसोबत सहलीला जाऊ शकता. त्यांच्यासोबत चांगला वेळ घालवाल.

**कुंभ**
तुमचे जीवन सुधारण्यासाठी काही चांगले बदल करण्याचा प्रयत्न कराल. दीर्घकाळ निरोगी राहण्यासाठी तुम्ही चांगला आहार घ्यावा.

**मीन**
एकाग्र चित्ताने केलेले काम फायदेशीर ठरेल. तुमच्या प्रियकरासाठी आजचा दिवस चांगला आहे. तुम्ही चांगल्या रेस्टॉरंटमध्येही जाऊ शकता.

# २७ गावांमधील रस्ते होणार पथदिव्यांनी प्रकाशमय

## २०७ रस्त्यांवर ४६७९ पथदिवे पोल उभारण्यात येणार

कल्याण : कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांच्या नेतृत्वाखाली महापालिका क्षेत्रातील २७ गावे व इतर ८ प्रभाग क्षेत्रातील मागणी असलेल्या ठिकाणी पथदिवे व्यवस्था करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रात सन २०१५ मध्ये २७ गावे समाविष्ट करण्यात आली. या २७ गावांमध्ये विद्युत पथदिवे व्यवस्था ही ग्रामपंचायत काळातील आहे, सदरची पथदिवे व्यवस्था तांत्रिकदृष्टया सक्षम व पुरेशी नसल्याने व या ठिकाणी नव्याने तयार करण्यात आलेल्या रस्त्यांवर नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कोणत्याही प्रकारची पथदिवे व्यवस्था नसल्याने, या ठिकाणच्या रस्त्यांचा सर्व्हे करुन नविन पथदिवे व्यवस्था करण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन शासनाकडे २७.९० कोटी निधीची मागणी करण्यात आली होती. शासना कडून या कामी महापालिकेच्या मागणीनुसार मुलभुत सुविधेकरीता निधी मंजुर करण्यात आला. २७ गावांमध्ये पथदिवे व्यवस्था करणेकामी निविदा प्रक्रिया सुरु असुन लवकरच काम हाती घेण्यात येणार आहे. त्यानुसार २७ गावातील मुख्य व अंतर्गत अशा एकूण २०७ रस्त्यांवर महापालिकेकडून पथदिवे व्यवस्था करण्यात येणार आहे. त्यामध्ये ४६७९ पथदिवे पोल उभे करण्यात येणार आहे. यामुळे महापालिकेच्या २७ गावातील सर्व रस्ते प्रकाशमय होणार आहेत.तसेच महा पालिकेच्या अ, ब, क, ड, जे, फ, ग व ह या प्रभागातील नागरीक, पालिका सदस्य, आमदार यांच्या मागणीनुसार पथदिवे नसलेल्या ठिकाणी आवश्यकतेनुसार नवीन पथदिवे व्यवस्था करणेकामी महापालिकेकडून प्रभागनिहाय रक्कम रु. ७.५० कोटीच्या निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. प्रभागातील मागणी असलेल्या ठिकाणी निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर पथदिवे उभारण्याचे काम महापालिकेकडून हाती घेण्यात येणार असल्याची माहिती विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत यांनी दिली आहे.

# शिंदे कुटुंबासह त्यांच्या वकिलांना सुरक्षा देण्याची नातेवाईकांची मागणी

कल्याण : अक्षय शिंदेच्या कुटुंबासह त्यांच्या वकिलांना सुरक्षा देण्याची मागणी अक्षय शिंदेचे चुलत काका अमर शिंदे यांनी केली आहे. तर किरीट सोमय्यांना संरक्षण दिलं जात तर मग अक्षय शिंदेच्या कुटुंबीयांना देखील संरक्षण देण्यात यावे अशी मागणी शिंदे कुटुंबाच्या वकिलांनी केली आहे. आज कल्याण कोर्टात अक्षय शिंदेची चार्जशिट घेण्यासाठी आणि संरक्षणाच्या मागणीसाठी शिंदे कुटुंबीय कल्याण कोर्टात आले होते. यावेळी दफन भूमी साठी पोलिसांचा फोन आला होता आम्ही जागा बघायला जातोय असे शिंदे यांनी सांगितले.

तर दफनभूमी साठी जागा मिळत नाही याबाबत न्यायाल यात सांगितल मात्र काल तसं काही घडलं नाही. अक्षय शिंदे यांच्या कुटुंबियांना आज दफनभूमीची जागा बघण्यासाठी पोलिसांनी बदलापूर येथे बोलावलं आहे, दोन तीन जागांची पाहणी करणार आहेत. किरीट सोमय्यांना संरक्षण दिलं जात तर मग अक्षय शिंदे यांच्या कुटुंबीयांना देखील संरक्षण देण्यात यावे. त्यांच्यासोबत मला सुद्धा सोशल मीडियावर अनेक कमेंट येतायत त्यामुळे माझ्या जीविताला धोका आहे म्हणून मला देखील संरक्षण मिळावं अशी मागणी शिंदे कुटुंबाचे वकील अमित कटारनवरे यांनी केली आहे. तर हे प्रकरण सरकारचे स्पॉन्सर आहे. अक्षयचा रोल आहे की नाही हे कुणालाच माहिती नाही, शाळेचे मुख्य आरोपी फरार असल्याचे अमित कटारनवरे यांनी सांगितले.

# किरीट सोमय्यांनी भ्रष्टचाऱ्यांना पक्षात घेतलं त्यांना कुणी जेल मध्ये टाकलं नाही - प्रियांका चतुर्वेदी




कल्याण : किरीट सोमय्यांनी भ्रष्टाचाऱ्यांना पक्षात घेतलं त्यांना कुणी जेल मध्ये टाकलं नाही अशी टीका शिवसेना खासदार प्रियांका चतुर्वेदी यांनी संजय राऊत यांना आज न्यायालयाने शिक्षा सुनावल्यावर केली आहे. चतुर्वेदी आज कल्याण पूर्वेत एका कार्यक्रमासाठी आल्या होत्या यावेळी पत्रकारांशी बोलत होत्या.

किरीट सोमय्यांनी ज्यांच्यावर आरोप केले ते सर्व त्यांच्यासोबत जाऊन बसले. भ्रष्ट्राचाराचे आरोप कुणी सिद्ध केले नाही, किंवा त्यांना जेल मध्ये पाठवलं नाही. संजय राऊत यांच्यासोबत जे काही झालं आहे, ते जनता बघत आहे. संजय राऊत १५ दिवसाची जेल वारी भोगून आल्यानंतर आम्हला जनतेचे समर्थन मिळणार असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.तर अक्षय शिंदे याच्याबाबत प्रतिक्रिया देताना प्रियांका चतुर्वेदी यांनी सांगितले कि, अक्षय शिंदे याने जे पाप केल आहे, त्याच्या कुटुंबाबात मी काही बोलणार नाही. शाळेचा संचालक तुषार आपटे अजून पर्यंत सापडलेला नाही, त्याला कधी पकडणार, सीसीटीव्ही कसे गायब झाले, त्या पीडित मुलींना कधी न्याय मिळणार. खरी परिस्थिती लपवण्यासाठी जे काम झालं आहे, त्याची लढाई आम्ही लढत राहणार असल्याचे खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी सांगितले.

### जीवनदीप महाविद्यालयातील खेळाडूंची

# महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागात विविध पदांवर थेट नियुक्ती


श्रुती तरे


जयवंती वसंत देशमुख


सोनाली छबुराव गीते


काजल कृष्णा भाकरे


कामिनी गणेश बोष्टे

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -**

गोवेली : जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेलीच्या खेळाडूंची महाराष्ट्र शासनातर्फे 'अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाड म्हणून शासनाच्या क्रीडा राजपत्रित अधिकारी, कर्मचारी पदावर थेट नियुक्ती करण्यात आली आहे.आतापर्यंत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक खेळांमध्ये सहभाग घेऊन घवघवीत यश संपादन केल आहे तसेच मुंबई विद्यापीठात जीवनदीप महाविद्यालय क्रीडा विभागामध्ये नेहमीच टॉप टेन क्रमांकात राहिले आहे. आणि आज याचा प्रत्यय पुन्हा एकदा आलेला आहे. गोवेली महाविद्याल याची विद्यार्थ्यांनी जयवंती वसंत देशमुख हिची कार्यकारी क्रीडा अधिकारी गट-ब मध्ये, सोनाली छबुराव गीते कार्यकारी क्रीडा अधिकारी गट-ब मध्ये तसेच श्रुती केशव तरे सहाय्य क्रीडा अधिकारी गट-क मध्ये यांची नियुक्ती झाली आहे. त्याचबरोबर काजल कृष्णा भाकरे कर्मचारी गट-ड,कामिनी गणेश बोस्टे कर्मचारी गट- ड या पदावर यांची नियुक्ती झाली आहे.या पूर्वीही जीवनदीप महाविद्यालयातील विद्यार्थी रेल्वे, महसूल, मंत्रालय, जिल्हा परिषद तसेच इतर केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागांमध्ये राजपत्रित पदावर कार्यरत आहेत. या पदापर्यंत पोहोचण्यासाठी विद्यार्थ्यांनी खूप मेहनत घेतली होती आणि आज त्यांच्या प्रयत्नांना यश आले आहे त्यांच्या या कामगिरीने त्यांनी जीवनदीप संस्थेचे नाव पुन्हा एकदा उंचावले आहे त्यांच्या या कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. रवींद्र घोडविंदे संचालिका सौ .स्मिता घोडविंदे,संचालक प्रशांत घोडविंदे, प्राचाय.डॉ. के.बी.कोरे उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे, प्रा. सुरेश चेडे,क्रीडा प्राध्यापक मोहनिष देशमुख, त्याचबरोबर सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी,खेळाडू विद्यार्थी , यांनी त्यांचे अभिनंदन केले तसेच सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# शिवळे महाविद्यालयात शिक्षक पालक संघ व विद्यार्थी सुरक्षा समितीची बैठक संपन्न




मुरबाड : मुरबाड तालुक्यातील विद्या मंदिर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय शिवळे येथे शासनाच्या आदेशानुसार शिक्षक पालक संघ व विद्यार्थी सुरक्षा समिती स्थापन करण्यात आली आहे या समितीची नुकताच शिवळे विद्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते या बैठकीच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य जे. बी. वाघेरे हे होते.

यावेळी विद्यालयाचे उपप्राचार्य मनोहर ईसामे, पालक संघाचे प्रतिनिधी तथा पत्रकार बाळासाहेब भालेराव, निशा कापडी, कामिनी वाकचौरे, ह.भ.प.दिनेश महाराज पवार, बाबू घोडेश्वर, मन्सूर शेख, बाबू वाघ, यांच्यासह विद्यार्थी सुरक्षा समितीचे विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीत प्रा. शरद सोनवणे व धनाजी दळवी यांनी पालक संघ व सुरक्षा समिती बद्दल चांगले विचार मांडून तसेच पालकांची भूमिका काय आहे तसेच विद्यार्थी सुरक्षा समितीचे महत्त्व काय यावर दोन्ही प्राध्यापकांनी सुंदर मार्गदर्शन केले तर विद्यालयाचे पर्यवेक्षक यशवंत धलपे यांनीही या बैठकीत पालक संघ सुरक्षा समिती बद्दल मोलाचे मार्गदर्शन केले.तर पालक प्रतिनिधीकडून लवकरात लवकर पालक सभा लावण्यात यावी अशी आग्रहाची मागणी करण्यात आली आहे. तर बैठकीचे अध्यक्ष तथा प्राचार्य जे.बी. वाघेरे यांनी पालक संघाच्या वतीने यांनी खऱ्या अर्थाने पालकांनी आपल्या पाल्यावर लक्ष ठेवण्यासाठी वेळ देण्यात यावा तसेच विद्यार्थी आपल्या घरी कशाप्रकारे अभ्यास करतो तसेच त्याच्या हातात किती तास मोबाईल असतो किंवा तो मोबाईल चा दुरुपयोग करतो का हे पालकांनी तपासले पाहिजे तसेच आमच्याकडे विद्यार्थी ज्यावेळी वर्गात असतो त्यावेळी आमचे सर्व शिक्षक वृंद जातीने लक्ष घालून त्यांच्याकडून हवा तेवढा अभ्यास करून घेतला जातो आम्हीही विद्यार्थ्यांना चांगले वागा तसेच चांगले विचार आणि अभ्यास करा तुम्ही पुढे जाऊ शकता आपल्या आई-वडिलांचे नाव मोठे करू शकता तसेच रस्त्यात जाताना एका रांगेत जावे जेणेकरून रस्त्यातून जाणाऱ्या वाहन चालकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये किंवा आपल्यालाही कोणत्या प्रकारची इजा होता कामा नये हे विद्यार्थ्यांनी ध्यानात ठेवले पाहिजे अशा प्रकारच्या सूचना दिल्या जातात व या बैठकीत ज्या. ज्या समस्यावर चर्चा केली त्या समस्याच निरसन तात्काल करण्यात येईल व तसेच शिक्षक पालक संघाचा ग्रुप तयार करण्यात येईल असे शुभ संकेत प्राचार्य जे. बी. वाघेरे यांनी दिले आहेत.

# परतीच्या पावसामुळे भातशेती धोक्यात

## ठाणे –पालघर जिल्ह्यातील शेतकरी चिंतेत

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -**

शहापूर ग्रामिण : गेल्या चार पाच दिवसांपासून विजेच्या कडकडाटसह पाऊस पडत असून या आलेल्या परतीच्या पावसामुळे हलवार भातशेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची भिती शेतकरी व्यक्त करीत आहेत.

ठाणे पालघर जिल्ह्यातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात हौशी व मेहनती, कष्टकरी शेतकरी भातशेतीची लागवड करतात . परंतु लागवड केलेल्या आणि आता तयार झालेले हलवार भात कापणीस तयार असतानाच या अचानक कोसळणाऱ्या पावसामुळे भातशेती प्रचंड धोक्यात आली आहे. त्यामुळे शेतकरी पूर्णपणे हतबल झाला असून तो प्रचंड चिंतेत आहे. भात लागवडीसाठी मजुरांची वाढलेली मजुरी, खतांचे वाढते दर लक्षात घेता शेतकरी पार मेटकुटीला आला असतानाही वडिलोपार्जित शेती केली पाहीजे या उद्देशाने नाईलाज म्हणून तो शेती करीत असतो पण निसर्गच कोपला तर काय करायचं अशी परिस्थिती निर्माण झाल्याने तो पुरता हवाल



दिल झाला आहे.

सध्या हलवार, निमहलवार व गरवा या मोडणाऱ्या प्रकारात भातशेती लागवड केली जात आहे. नवनवीन भात बियाणे यांची लागवड करण्यात आली आहे. एकीकडे लागवड केलेल्या भातशेती कापणीच्या तयारीत शेतकरी असताना दुसरीकडे आलेल्या या जोरदार पावसामुळे भातशेती नुकसानीला सामोरे जावे लागणार आहे. हलवार भातबियाणं हा तयार झाला असून निमहलवार तयारीत आहे तर गरवा भातशेती दाणा तयार होण्यास अद्याप वेळ आहे. शेतात उभी असलेली भातपीक शेतात पडून भातदाणा व भात तणस भिजून नुकसान होणार आहे.

दरम्यान विजेच्या कडकडाटसह पावसाने जोर धरला असून या आलेल्या परतीच्या पावसामुळे भातशेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची भिती शेतकरी व्यक्त करीत आहेत. सदर,हलवार पिकांचे भातदाणां तयार असल्यानं काही भागात कापणीची तयारी असून काही भागात भातदाणा निसावत आहे परंतु या आलेल्या पावसामुळे भातशेतीचे प्रचंड नुकसान होणार असल्याचे शेई येथील शेतकरी दिपक तारमळे, रमेश तारमळे, शांताराम तारमळे तानाजी तारमळे यांनी प्रस्तुत प्रतिनिधिशी बोलताना सांगितले. ज्यां भात पिकांची भातलोंबी बाहेर पडलेली आहेत अशा भातपिकांवर फारसा परिणाम जाणवणार नाही मात्र अति पावसामुळे पोटरीत पाणी शिरलं तर निमगरव्या भातपिकांमध्ये पलिंद तयार होऊन उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता असल्याचे अनेक शेतकऱ्याकडून बोलले जात आहे.

# आदिवासी लोकसंस्कृती थेट राजस्थानच्या राजभवनात

## महाराष्ट्रातुन प्रथमच राजस्थानाच्या गावात शाळकरी मुलांना शैक्षणिक भेट

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -**

पालघर : राजस्थान राज्याच्या राजभवनात महामहिम राज्यपाल हरिभाऊ बागडेजी यांना पालघर जिल्हातील घरकुल अभियंता विक्रम दिपक गावंडे यांनी पालघर जिल्हाची आदिवासी लोकसंस्कृति दर्शवणारे तारपा वादय याची प्रतिकृति डॉ.गजानन पाईकराव यांच्या समवेत सप्रेम भेट म्हणुन दिली. त्याच बरोबर पालघर जिल्ह्यात प्रामाणिकपणे घरकुल अभियंता म्हणुन काम करत असताना सामाजिक बांधीलकी चे भान ठेवुन गरीब व






गरजु विद्यार्थ्यां ना शिक्षणा करीता लागणारे साहित्य दुरवर वसलेल्या गाव पातळी वर जाऊन वाटप करत असल्याची माहिती मा.राज्यपाल महोदय यांना दिली.या बद्दल मा.राज्यपाल महोदय यांनी केलेल्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. त्याचबरोबर राजस्थान राज्यातील गाव .नारायणपुरा ता.बाँदीकुई जि.दौसा येथील राजकीय उच्च प्राथमिक शाळेतील सर्व गरीब व गरजु विद्यार्थ्यांना तसेच शिक्षकांना सुद्धा शाळेत पाण्याची कमतरता असल्या कारणाने घरुन येताना ,पाणी पिण्या करीता ,उत्तम दर्जाचे पिण्याच्या पाण्याच्या बॉटल वाटप करण्यात आल्या. महाराष्ट्राच्या मातीतुन राजस्थान राज्यातील सदर गावाला मिळालेली हि मदत प्रथमच आहे असे सदर उपक्रमास उपस्थित असलेल्या ग्रामस्थांनी सांगितले. सदरील उपक्रमास विक्रम गावंडे यांच्या सोबत डॉ.गजानन पाईकराव यांचे मोलाचे सहकार्य लाभले त्यांच् बरोबर नारायणपुरा येथील ग्रामस्थ , पंचायत समिति सदस्य, शाळेतील सर्व शिक्षक तसेच मुख्याध्यापक यांनी उपस्थित राहुन सर्वांच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त करून महाराष्ट्रा प्रति आपले प्रेम व्यक्त केले.भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे समाजातील प्रत्येक दुर्बल घटकास शिक्षण मिळावे हि इच्छा व ज्या प्रमाणे बाबासाहेब म्हणतात की' शिक्षण हे वघिनिचे दुध आहे अन जो ते प्राशन करेल तो वाघासरखा गुर गुरल्याशिवाय राहणार नाही ' यांच्या विचारांचा आदर्श घेऊन कोणीही विद्यार्थी शिक्षणापासुन वंचित राहु नये हे बाबासाहेबांचे स्वप्न पुर्ण व्हावे व आपल्या भारतातील प्रत्येक दुर्लक्षित भागात माझ्या हातुन शिक्षणाची बीजे रोवली जावी हिच आशा श्री.विक्रम दिपक गावंडे यांनी व्यक्त केली.

# शशिकांत घरत, ग्रा. प. सदस्य यांची ग्रामस्थांसह पूरसदृश्य चाफेवाडीची पाहणी

सफाळे : पालघर जिल्हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्या 'जनसंवाद' अभियानांतर्गत सफाळे पोलीस ठाणे येथील प्रभारी पोलीस अधिकारी दत्ता शेळके सपोनि. यांच्या मार्गदर्शनाखाली, सफाळे पो. ठाणे कार्यरत प्राजक्ता पाटील पो. उप. निरीक्षक आणि महेंद्र शर्मा- पो. ह. सरोज भोसले - शेळके म. पो. कॉ. यानी सफाळे पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात येणाऱ्या जिल्हा परिषद माध्यमिक शाळा तांदुळवाडी, ता. जि. पालघर.येथे विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्या साठी, पोलीस दादा, पोलीस दिदि मदत, आणि आजच्या घडीला समाजातील तरूण वर्गाकडून होणारा वापर व त्यामुळे परिणाम याबाबत माहिती देण्यासाठी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी महिला पोलीस प्राजक्ता पाटील यांनी बालकांच्या सुरक्षेसाठी काय करावे, याबद्दल बोलताना त्यांनी सांगितले, मुले आणि मुलींनी शाळेत किंवा रस्त्याने जात येत असतांना, अन



ओळखी व्यक्तीने आपले नाव गाव आदी काही विचारले असतांना सांगू नये किंवा दिले तर घेऊ नये. आपणास जर कोणी त्रास देत असेल किंवा काही चित्र विचित्र घडत असेल ते पाहून घाबरून नका. त्या संबंधित माहिती शाळेत लावलेल्या तक्रार पेटीत कागदावर लिहून टाकावी किंवा शिक्षणासाठी आपल्याला आई/ वडील यांनी दिलेल्या मोबाईल वर ११२ नंबर डायल करून माहिती देणे. किंवा आपल्या रक्षणासाठी असलेल्या पोलीस दादा / दिदी यांना सांगवी. आपल्याला लगेच मदत मिळेल. आधुनिक विज्ञानाच्या काळ आहे. मोबाईल मुळे आपण अमेरिकेतील व्यक्ती बरोबर क्षणात बोलू शकतो. ऑनलाईन शिक्षण पध्दती मुळे प्रत्येक विद्यार्थी यांच्या हातात मोबाईल आला आहे. परंतु मोबाईलच्या जास्त वापरामुळे, संस्कार, नितिमत्ताचा विसर पडत आहे. त्यामुळे मानसिक चीडचीड, अनिद्रा आदी निर्माण होतात. तसेच मोबाईल फोन आणि सोशल मीडियाचा होत असलेले गैरवापर, उदाहरणार्थ सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट केल्यानंतर टाकणाऱ्यावर सुध्दा गुन्हे दाखल होतात. असेही सांगण्यात आले. कार्यक्रमातील विद्यार्थी, पालक, शिक्षक यांच्या अडचणी समजून घेत त्यावर योग्य ते मार्गदर्शन प्राजक्ता पाटील मॅडम,प्रमाणे महेंद्र शर्मा पो. हवा. व भोसले मॅडम यांनी ही आपल्या आप आपल्या परीने केले. यावेळी शालेय शिक्षण समिती पदाधिकारी, शाळेतील शिक्षक गण, सुजित पाटील - पोलीस पाटील, पोलीस ठाणे शांतता कमिटी सदस्य महेंद्र ठाकूर ग्रामपंचायत पदाधिकारी ग्रामस्थ उपस्थित होते

# मुरबाड तालुका शेतकरी सहकारी संघाची आर्थिक वाटचाल चांगल्या प्रमाणात

## – सुभाष पवार यांचे प्रतिपादन!

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -**



मुरबाड : मुरबाड तालुका शेतकरी सहकारी संघाची आर्थिक वाटचाल चांगल्या प्रमाणात आहे असे प्रतिपादन ठाणे जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष तथा शेतकरी संघाचे संचालक सुभाष पवार यांनी मुरबाड बाजार समितीच्या सभागृहात आयोजित केलेल्या मुरबाड तालुका शेतकरी संघाच्या वार्षिक सभेत केले. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार गोटीरामभाऊ पवार. खरेदी विक्री संघाचे माजी चेअरमन रामभाऊ दळवी. संघाचे विद्यमान चेअरमन किसन गिरा, व्हाईस चेअरमन जयवंत हरड. बँकेचे माजी संचालक रघुनाथ बांगर,विद्यमान संचालक म्हणून प्रकाश पवार, जगन्नाथ गुडे, सुरेखा फनाडे, विद्यागौरी चौधरी, यांच्यासह तालुक्यातील सेवा सोसायटीचे चेअरमन / व्हाईस चेअरमन, सरपंच /उपसरपंच शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मुरबाड तालुका शेतकरी संघाचे वार्षिक पुस्तकाचे अहवाल चे वाचन संघाचे व्यवस्थापक रमेश घागस यांनी इतिवृत्त वाचून दाखवले त्यानंतर यावर सविस्तर सभेत चर्चा करण्यात आली व सर्वानुमते सर्व ठराव मंजूर करण्यात आले त्यानंतर संचालक सुभाष पवार यांनी बोलताना सांगितले की मागील काही वर्षे पाहता आणि आताच्या घडीला मुरबाड तालुका शेतकरी संघाची आर्थिक स्थिती अतिशय चांगली आहे आणि ही कमिटी मन लावून माजी आमदार गोटीरामभाऊ पवार यांच्या नेतृत्वाखाली काम करत आहे तसेच वेळोवेळी शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांना न्याय देत आहे,, शेतकरी आल्यानंतर शेतकऱ्यांच्या विचारपूस करणे शेतकऱ्याचा भात किती आहे तो कशा प्रकारे घेता येईल ही सर्व माहिती मुरबाड खरेदी विक्री संघ शेतकऱ्यांना वेळोवेळी देत आहे. त्यानंतर अध्यक्षीय भाषणात माजी आमदार गोटीरामभाऊ पवार पवार म्हणाले की मुरबाड खरेदी विक्री संघाची कामाची पद्धत शेतकरी वर्गासाठी अतिशय चांगली आहे आणि लवकरात लवकर शेतकरी वर्गांचा ४० हजार क्विंटल भात घेण्यासाठी या संकुलात चांगलं गोडाऊन बांधण्यात येणार असल्याचे शुभ संकेत माजी आमदार गोटीरामभाऊ पवार यांनी दिले. कार्यक्रमाचे आभार संघाचे व्यवस्थापक रमेश भगत यांनी मानले.

## खाडी किनाऱ्यांचा विकास...

पान १ वरून ▶▶ कोटी इतका असून त्याला राज्य सरकारने मंजुरी देण्यात आली आहे. तर मंजूर खर्चातून १२१ कोटी खर्चाची निविदा प्रक्रिया पालिकेकडून राबविण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पहिल्या टप्प्यातील कामासाठी पर्यावरण विभागाच्या महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑथॉरिटीकडून २३ सप्टेंबर रोजी पालिकेला सीआरझेड परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे कामाचा मार्ग मोकळा झाला असून हे काम पुढील २ वर्षात पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आल्याचे त्यांनी म्हटले.

वरसावे ते घोडबंदर खाडी किनाऱ्याला पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करण्याचा आराखडा पालिकेकडून तयार करण्यात आला असून त्यात पर्यटकांना चालण्या-फिरण्यासाठी प्रशस्त पाथ वे, विविध प्रकारचे आकर्षक गार्डन्स, विसर्जन घाट, लहान मुलांना खेळण्यासाठी जागा, बसण्यासाठी विविध तसेच आकर्षक पद्धतीची आसन व्यवस्था केली जाणार आहे. याखेरीज मिया वाकी धर्तीवर दाट झाडांचे उद्यान साकारण्यात येणार असून हिरवेगार लॉनसह पार्किंग सुविधा, व्हॉली बॉल तसेच फुटबॉल खेळण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**इको-फ्रेंडली साहित्य वापरणार**

या ठिकाणी आकर्षक विद्युत रोषणाई, सुसज्ज जेटी, दशक्रिया घाट अशी विविध कामे देखील केली जाणार आहेत. या ठिकाणी वॉटर स्पोर्ट्सची सुविधा उपलब्ध करून देण्याचा विचार सुरु असून या खाडी किनाऱ्यावर जेथे कांदळवन आहे. तेथे लाकडाचे म्हणजेच इको फ्रेंडली साहित्य वापरण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

या खाडी किनाऱ्यावर जेथे घाट बांधले जाणार आहेत त्याखेरीज इतर ठिकाणी लोकांचा थेट पाण्याशी संपर्क होणार नाही, याची खबरदारी घेण्यात आली आहे. यामुळे हे ठिकाण केवळ मिरा-भाईंदरच नव्हे तर मुंबई, ठाणे, वसई-विरारमधील लोकांसाठी महत्वाचे पर्यटन केंद्र बनेल, असा विश्वास सरनाईक यांनी व्यक्त केला.

## भाजप अध्यक्षपदी महिला...?

पान १ वरून ▶▶ राजे या गेली अनेक वर्षे आमदार आणि खासदार म्हणून निवडून येत आहेत. दरम्यान आता राष्ट्रीय स्वयंसेवक संघांने जर का त्यांच्या नावाला पसंती दिली असेल तर भाजपचे संसदीय समिती कोणता निर्णय घेणार ते पहावे लागणार आहे. अनेक राज्यात नवीन अध्यक्ष नेमले जाऊ शकतात.

पक्षाचा राष्ट्रीय अध्यक्ष कोण असेल यावर चर्चा होऊ शकते. जी नावे चर्चेत होती ती नावे आता मंत्रिमंडळात सहभागी आहेत. माजी मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान, माजी मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर, भूपेंद्र यादव, केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या नावाची चर्चा होती. मात्र आता हे नेते केंद्रीय मंत्रिमंडळात सहभागी असल्याने कोणाची वर्णी अध्यक्षपदी लागणार हे पाहावे लागणार आहे. दरम्यान भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी देवेंद्र फडणवीस यांचे नाव अधिक चर्चेत आहे. तसेच भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांच्या नावाची देखील चर्चा सुरू आहे. तर आता संघाकडून वसुंधरा राजे यांचे नाव सुचवण्यात आल्याने त्यांची या पदावर वर्णी लागणार का हे पहावे लागणार आहे.

**ऑगस्टमध्ये झाली बैठक**

RSS आणि भाजपच्या बैठकीत यासंबंधात चर्चा झाली आहे. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या निवासस्थानी पाच तास बैठक झाली. यावेळी भाजपचा पुढील अध्यक्ष कोण होणार याबाबत चर्चा झाली. काही दिवसांपूर्वी देवेंद्र फडणवीस भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष होणार असल्याची चर्चा होती. मात्र आगामी विधानसभा निवडणुकीची जबाबदारी देवेंद्र फडणवीसांकडे सोपवल्यानंतर आता राष्ट्रीय अध्यक्षपदाची चाचपणी केली जात आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा, राजनाथ सिंग, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आरएसएस सदस्य दत्तात्रय होसबले आणि सह सरचिटणीस अरुण कुमार बैठकीत उपस्थित होते. आतापर्यंत भाजपच्या अध्यक्षपदावर एकदाही महिलेची नियुक्ती करण्यात आलेली नाही. त्यामुळे जर भाजपने राष्ट्रीय अध्यक्षपदी महिलेची नियुक्ती केली तर हे मोठं पाऊल मानलं जाऊ शकतं.

# जिजाऊच्या वतीने खर्डी येथे नेत्र शिबीर

## ३५० रुग्णांनी घेतला लाभ




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**खर्डी,ता.२७ :** जिजाऊ सामाजिक संस्थेचे म संस्थापक अध्यक्ष निलेश सांबरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखालीखर्डी विभागप्रमुख अशोक विर यांनी आयोजित केलेल्या खर्डी येथील जिजाऊ क्लिनिक मध्ये मोफत आरोग्य व नेत्र तपासणी शिबिरात ३५० हून अधिक रुग्णांची तपासणी करण्यात आली. १५० हून अधिक रुग्णांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले तया शिबिराच्या माध्यमातून मोतीबिंदू असलेल्या ३५ रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी जिजाऊच्या झडपोली येथील रुग्णालयात पाठवण्यात येणार आहे.डॉ.दीपा सोनी व डॉ.प्रतीक्षा वलटे यांनी यावेळी रुग्णांची तपासणी केली.यावेळी खर्डी विभागप्रमुख अशोक वीर,जिजाऊ समन्वयक कमलेश वेखंडे, दिपक तूपांगे,समाधान सांडे,किशोर घरत,हर्षल पवार,अक्षय लखांबरे, अक्षय सावंत,गजानन म्हसकर,सोमनाथ म्हसकर,महिला पदाधिकारी सुचिता भोळे,अनिता शेणे व शांता पंडित उपस्थित होत्या.

# सुनील झळके 'स्टार महाराष्ट्राचे' पुरस्काराने सन्मानित

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**☐ प्रतिनिधी**

सामाजिक शैक्षणिक राजकीय साहित्य कला अशा विविध क्षेत्रांमध्ये शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या व्यक्तींचा शोध घेऊन नवी मुंबई येथील एमसीएम टीव्ही व साई सागर एंटरटेनमेंट चे संपादक जनार्दन शिंदे यांच्यावतीने भिवंडीतील सुनील झळके यांना 'स्टार महाराष्ट्राचे' -२०२४ हा यंदाचा मानाचा पुरस्कार पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात नुकताच पार पडलेल्या कार्यक्रमांमध्ये पनवेल महानगरपालिकेतील विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे व संपादक जनार्दन शिंदे यांच्या हस्ते सन्मानपूर्वक प्रदान करून,त्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.




सुनील झळके हे गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक साहित्य लेखन पत्रकारिता सहकार कला इत्यादी क्षेत्रांमध्ये कार्यरत असून त्यांना यापूर्वी विविध संस्थांचे अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत त्यांच्या या क्षेत्रातील भरीव योगदानाची दखल घेत त्यांना हा यंदाचा स्टार महाराष्ट्राचे पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे याबाबत त्यांना विचारले असता त्यांनी सांगितले की, 'माझी आई निरक्षर असून सुद्धा मला तिने साक्षर बनवले आणि पुढे जाण्यास नेहमीच प्रोत्साहन दिल्याने हा पुरस्कार मला प्राप्त झालेला आहे, त्यामुळे हा पुरस्कार मी माझ्या आईच्या चरणी अर्पण करतो.'अशा शब्दात त्यांनी आपल्या आईप्रति प्रेम आणि आदर व्यक्त केला.

सदर पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी विनोदी अभिनेते जॉनी रावत राजेश खर्डे वेसावकरांचे परंपरा अतुल धोत्रे बाळूमामा फेम पनवेल महानगरपालिकेच्या नगरसचिव मनीषा बाविस्कर व इतर अनेक क्षेत्रातील मान्यवर मंडळी कार्यक्रमास उपस्थित होते.

## नर्सरीसाठी निधी नाही?...

पान १ वरून ▶▶ वाचवा या नाऱ्याला कालांतराने पूर्णविराम लागला आहे. बंद होण्याच्या मार्गावर असलेल्या जिल्हा परिषद शाळांचे अस्तित्व नव्याने उभारण्यासाठी गेली पंधरा वर्षे या नर्सरी वर्गानी सुवर्ण भूमिका बजावली आहे. परंतु, आजची परिस्थिती पाहता सहास्थितीत जिल्हा परिषद शाळेची लाइफलाइन असलेल्या या नर्सरी वर्गाकडे सरकारने पाठ फिरवली आहे. त्यामुळे ठिकठिकाणी सुरू झालेल्या या शाळा आता बंद झाल्या आहेत. याला केवळ सरकारचा कामसाधूपणा आणि उदासीन धोरण जबाबदार असल्याचे बोलले जाते.

आशिया खंडातील ठाणे जिल्हात प्रथम सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत प्रत्येक तालुक्यात दोन वर्ग अशा जिल्हाभरात २४ शाळेमध्ये हा शैक्षणिक प्रयोग राबविण्यात आला होता. पुढे ठाणे-पालघर फाळणी होऊन जिल्हा परिषदेच्या निम्या शाळा पालघर जिल्हामध्ये गेल्या. त्यावेळी जिल्हा परिषदेने आपल्या सेस फंडातून हा उपक्रम राबविण्यास सुरुवात केली होती. मात्र सन २०१९ पासून जि. प. कडून या वर्गाची ग्रंट बंद करण्यात आल्याने सहास्थितीला बहुतेक ठिकाणी या शाळा बंद करण्यात आल्या असून काही ठिकाणी केवळ लोकसहभागातून सुरु आहेत. त्यापैकी मुरबाड तालुक्यातील सरळगाव व मुरबाड शहरातील जिल्हा परिषद शाळा क्र. २ येथील पटसंख्या कौतुकास्पद म्हणावी लागेल. तर या वर्गांना कागदोपत्री शासन दरवारी कायमचे स्थान देण्यात यावे, यासाठी अनेक वर्षांपासून मंत्रालयात प्रकरण प्रस्तावित आहे. मात्र मंत्रालयातून मंजुरी नसल्याने लेखा परीक्षण अहवालात ताशेरे ओढले जात आहे.

**शिक्षकांचे भविष्य अंधारमय**

तुटपुंज्या अनियमित मानधनावर या नर्सरी वर्गासाठी नियुक्ती करण्यात आलेल्या शिक्षकांना पाच हजार रुपयांमध्ये सुरुवातीची सुमारे ९ वर्षे राबवून घेतले. या मानधनात शिक्षकांचा प्रवास खर्च ही सुटला नाही. मात्र सन २०१९ नंतर ते ही बंद केले. त्यामुळे या शिक्षकांच्या भवितव्याची भरपाई न होणारे नुकसान झाले आहे. हे वर्ग टिकविण्यासाठी वर्षानुवर्षे या शिक्षकांनी जिल्हा प्रशासन, लोकप्रतिनिधीकडे हेलपाटे मारले. कितु, त्यांच्या पदरी नैराश्या व्यतिरिक्त काहीही पडले नाही. मुलाखतीमध्ये कसोटीवर घासून निवडण्यात आलेले हे शिक्षक उच्च शिक्षित असून त्यांचा शिक्षणाचे फलित होत नसल्याने या नर्सरी वर्गावर काम करणाऱ्या शिक्षकांचे भविष्य अंधारमय झालेले दिसून येत आहे.

**चिंतातुर पालकवर्ग**

मुरबाड शहरातील खासगी शाळेचे रेटकार्ड पहाता पालकांना भरगव्य फी आकारून देखील प्रत्येक गोष्टीला विद्यार्थ्यांकडून पैशांची मागणी केली जात असते. शिक्षण विभागातील हप्तेखोरीमुळे पालकांच्या यासंदर्भातील तक्रारीना केराची टोपली दाखवली जात असल्याचा आरोप होत आहे. मात्र प्रायोगिक तत्वावरील या शाळेमध्ये विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणा सोबत अनावश्यक शैक्षणिक खर्चाच्या व्यापापासून देखील सुटका होते. शिवाय बाल्यावस्थेतय पाल्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नर्सरी शिक्षक विशेष मेहनत घेत असल्याने विध्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेत वाढ झाल्याचे पालकांना अनुभवात पडत आहेत. त्यामुळे पालकांचा या नर्सरी वर्गांना प्रतिसाद चांगला आहे.

## कायद्याची जरब फक्त...

पान १ वरून ▶▶ जारबा बसवण्याची यंत्रणा अन्न प्रशासनाने कागदावरच ठेवल्याचे चित्र आहे.

**अहवाल प्रलंबित**

अन्न प्रशासनाने एप्रिल ते ऑगस्ट २०२४ या ५ महिन्यात सुमारे २०५५ अन्न पदार्थाचे नमुने आपल्या अधिकृत प्रयोगशाळांकडे तपासणीसाठी पाठवले आहेत. त्यातील ४०८ अन्न पदार्थाचे नमुने दर्ज्यानुसार, उपदर्ज्याचे ३४, असुरक्षित ११, अप्रमाणित २१ एवढेच अहवाल प्रयोगशाळेकडून प्राप्त झाले आहेत. उर्वरित १,५७२ अन्न पदार्थांचे नमुन्यांचे अहवाल प्रलंबित आहेत. राज्यात अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांची ३५ टक्के पदे रिक्त आहेत. ते अधिकारी काम करतात, त्यांना अहवाल वेळेत मिळत नसल्याने त्यांना संबंधित उत्पादक, विक्रेत्यावर कारवाई करता येत नाही, आणि उशिरा अहवाल मिळाला तर संबंधितांवर केलेला खटला कुचकामी ठरतो. संबंधित आरोपी उशीरा आलेल्या अहवालावर बोट ठेवून कायद्याच्या कचाट्यातून आपली सुटका करून बिनबोभाट्याने व्यवसाय सुरू ठेवतो, अशी स्थिती आहे, त्यामुळे कारवाई, तपासणी करून त्याचे फलित काय, असा सवाल अनेक अधिकारी खासगीत उपस्थित करतात.

राज्यातील अन्न सुरक्षा अधिकाऱ्याने केलेल्या कारवाईत विक्रीच्या दृष्टीन संशयास्पद आढळलेल्या अन्न पदार्थांच्या नमुन्यांचा अहवाल प्रशासनाला १४ दिवसात संबंधित प्रयोगशाळेकडून मिळण्याची तरतूद कायद्यात आहे, प्रत्यक्षात कारवाईनंतर अन्न प्रशासनाच्या प्रयोगशाळेकडे पाठवलेला अन्न पदार्थांचा अहवाल अनेक तपासणी कारवाईत ६-६ महिने उलटून गेले तरी येत नाही, त्यामुळे अनेकदा भेसळ करणाऱ्या विक्रेता, पुरवठादार, उत्पादक कायद्याच्या कचाट्यातून पळ काढतात आणि अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांच्या कारवाईची मेहनत पाण्यात जाते, असे चित्र सध्या महाराष्ट्रात आहे.

ग्राहकांना निर्भेळ अन्न व अन्नपदार्थ मिळावेत, यासाठी राज्यात २०११ पासून नवीन अन्न सुरक्षा व मानदे कायद्याची प्रभावी अंमलबजावणी सुरू करण्यात आली. या कायद्यात अन्न उत्पादक, पॅकर, घाऊक विक्रेते, वितरक आणि अन्न विक्रेते यांचा समावेश होतो. त्यामुळे अन्न प्रशासनातील अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी अन्न पदार्थांची तपासणी केल्यानंतर त्यांना जर एखादा अन्न पदार्थ भेसळयुक्त किंवा कायद्यातील तरतुदीनुसार त्याची विक्री होत नसल्याचे आढळल्यास त्या पदार्थाचा नमुना अन्न प्रशासनाच्या प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविला जातो. या पदार्थाचा तपासणी अहवाल १४ दिवसांत आल्यानंतर संबंधितांवर कारवाई करण्याची तरतूद आहे, अन्न प्रशासनाच्या राज्यात मुंबई, छत्रपती संभाजी नगर आणि नागपूर येथे प्रयोगशाळा आहेत.

दर सणासुदीच्या दिवसाला अन्न प्रशासनाच्या वतीने फेस्टीव्हल डाईव्हमध्ये मोठ्या प्रमाणात अन्न पदार्थांचे नमुने घेतले जातात आणि तपासणीसाठी पाठविले जातात. अनेकदा ते पदार्थ नियमबाह्य किंवा अन्न सुरक्षा मानके कायद्याच्या निकषानुसार विक्री होत नसल्याचे निदर्शनास येवूनही केवळ अहवाल येत नसल्याने अधिकाऱ्यांना संबंधित विक्रेता, उत्पादकांवर व्यवसाय बंद ठेवण्याची कारवाई तसेच दोषी आढळल्यास खटला भरता येत नाही, हे जळजळीत वास्तव आहे.

**अन्न पदार्थांच्या प्रलंबित अहवालाचा प्रश्न निकालात काढण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने राज्यातील प्राधिकृत अन्न चाचणी प्रयोगशाळांशी करार करण्यासाठी सुमारे २१ कोटी रुपये मंजूर केले आहेत. तसेच शासनाच्या नागपूर, छत्रपती संभाजी नगर आणि मुंबई येथील प्रयोगशाळेत ५५ पदे भरण्यात येणार आहेत. अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांची सुमारे १९२ पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे, या सर्व बाबींची लवकरच पूर्तता होणार असल्याने अन्न पदार्थांचे अहवाल प्रलंबित राहाणार नाही.**

**- उल्हास इंगवले,**
**सह आयुक्त मुख्यालय,**
**अन्न आणि औषध प्रशासन**

# संत सेनाजी महाराज केशशिल्पी महामंडळ कार्यान्वीत करा - नाभिक समाजाची मागणी

## ३० सप्टेंबर रोजी मुंबईत महाधरणे आंदोलन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

नाभिक समाजासाठीचे संत सेनाजी महाराज केशशिल्पी महामंडळ कार्यान्वीत करा या मागणीकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्रतील सकल नाभिक समाज दि.३० सप्टेंबर रोजी सोमवारी आझाद मैदान मुंबई येथे एकदिवसीय राज्यव्यापी महाधरणे आंदोलन करून शासनाचे लक्ष वेधून घेणार असल्याची माहिती किरण भांगे यांनी दिली.

आज मुंबईत मुंबई मराठी पत्रकार संघात झालेल्या पत्रकार परिषदेला सकल नाभिक समाजाचे किरण भांगे यांच्यासमवेत अखिल भारतीय जिवा सेनेचे कार्याध्यक्ष अनिल बोरनारे, प्रसिद्धी प्रमुख मनोज कोरडे, राष्ट्रीय नाभिक समाजाचे अध्यक्ष अरुण जाधव राष्ट्रीय नाभिक महासंघाचे अध्यक्ष भगवान बिडवे, महिला प्रदेशाध्यक्ष भारती सोनवणे, सलून ब्युटी पार्लर असोसिएशनचे कार्याध्यक्ष निलेश रणदिवे आदी पदाधिकारी उपस्थित होते

शासनाकडे दिलेल्या निवेदनात केशशिल्पी महामंडळास १००० कोटी रुपयांचा निधी द्यावा, उपकंपनीचे मुंबई मुख्यालयातील बारा प्रशासकीय अधिकाऱ्यांची पदे भरण्यासाठी शासनाने जाहिरात काढावी व संचालक मंडळातील अध्यक्ष,उपाध्यक्ष,शासकीय सदस्य यांच्या निवडी कराव्यात,थेट कर्ज योजनेतील सिबिल व जामीनदारांची जाचक अट शिथिल करावी, [illegible] लेटरहेड,कार्यालय,माहितीपत्रक यांचेवर सेना महाराजांचा फोटो वापरावा या आंदोलनाच्या प्रमुख मागण्या आहेत.१३ सप्टेंबर १९ रोजी स्थापन केलेले केशकला बोर्ड अग्रेषित करून दि.०५ जाने २०२४ रोजी ओबीसी महामंडळाची उपकंपनी क?ण्यात आलेली आहे.अर्थसंकल्पीय अधिवेशनात यासाठी निधीची तरतूद केलेले आहे,परंतु कोणतीही अद्याप कारवाई झालेली नाही. त्यामुळे शासनाने ५ वर्षात समाजाला फक्त आश्वासनांचे गाजर दाखवून फसवणूक केली असल्याची भावना नाभिक समाजाची झाले आहे.म्हणून महाराष्ट्रातील विविध संघटना एकत्र आल्या आहेत.

## अधिकाऱ्यांच्या बदल्या...

पान १ वरून ▶▶ या बैठकीत दोन्ही शिवसेना, भाजप, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस, मनसे आणि आम आदमी पक्षाच्या सदस्यांनी हजेरी लावत निवडणुकीच्या संदर्भात आपल्या भूमिका स्पष्ट केल्या. तसेच काही सूचनाही दिल्या..

वरिष्ठ नागरिकांची वयोमर्यादा ८५ वर्षावरून ८० वर्ष करण्यात यावी. त्यामुळे या वरिष्ठ नागरिकांना घरी मतदानांची सोय करता येईल,अशी मागणी शिवसेना शिंदे गटाचे नेते राहुल शेवाळे यांनी निवडणूक आयोगाकडे केलीय. तसेच उमेदवार खर्च मर्यादा १५ लाख रुपयांनं वाढवावी,अशी मागणीही केली शेवाळे यांनी केलीय.

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट आणि पोटगी, नावात बदल बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.

कार्यालय - 9619188558 ■ +91 9158078601

ईमेल- jeevandeepvartanews2020@gmail.com

## रिलायन्सचा टेक्सटाईल पार्क...

पान १ वरून ▶▶ एमआयडीसीला पाठवण्यात आली आहेत. पालघर तालुक्यातील टोकराळे (केळवे रोड) येथील सर्वे नंबर ६, ८, १०, ११, १२अ, १३, १४, ३१, ३३ व ३४ मधील ११२ हेक्टर म्हणजेच २७६ एकर आणि माहीम गावातील सर्व्हे नंबर ८३५/1 मधील ६३ हेक्टर म्हणजेच १५५ एकर आणि सर्व्हे नंबर ८३६ मधील ११७ हेक्टर म्हणजेच २८९ एकर जमीन याशिवाय माहीम गावादील सर्व्हे नंबर ९७४ मधील ४५.५ हेक्टर १११ एकर जमीन टेक्स्टाईल पार्कसाठी मागण्यात आली आहे.

**पाण्याची आवश्यकता**

या नियोजित टेक्स्टाईल पार्कसाठी दररोज सुमारे ६५ दशलक्ष लिटर पाण्याची आवश्यकता असून त्यासाठी अस्तित्वात असणाऱ्या काही बंधाऱ्यामधून तर काही नवीन बंधारे उभारण्याच्या दृष्टीने विचार विनिमय केला जात आहे. या टेक्सटाईल पार्कला दळणवळणाच्या दृष्टीने पालघर येथून रुंद रस्ते उभारण्याची आवश्यकता भासणार असून त्यादृष्टीने देखील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाहणी केली आहे.

सर्व्हे नंबर ८३५ व ८३६ या ठिकाणी काही प्रमाणात वन विभागाची जमीन किंवा संरक्षित वन असल्याची शक्यता असून त्या संदर्भात महसूल विभाग कागदपत्रांचा अभ्यास करित आहे. संबांधित जमिनीच्या सात-बारा उताऱ्यांवर प्रत्यक्षात वन विभागाच्या नोंदी नसल्या तरीही प्रत्यक्षात त्या ठिकाणी काही प्रमाणात कांदळवन असल्याचे दिसून आले आहे. शिवाय लगतच्या मिठागरांसाठी समुद्राच्या पाणी पुरवणारे खाडी क्षेत्र या भागात असल्याने सागरी नियमन क्षेत्र (सीझेडएमपीएस) कायद्यामुळे किती क्षेत्र बाधित होऊ शकेल याचा देखील अभ्यास केला जात आहे. टेक्सटाईल पार्कच्या उभारणीमुळे या भागात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होण्याची शक्यता असली तरीही मोठ्या प्रमाणात सांडपाणी निर्मित होत असल्याने मासेमारीवर दीर्घकालीन परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, जमीन हस्तांतर पार झाल्यानंतर राज्य शासन अन् एमआयडीसीला किती मोबदला मिळणार हे समोर आलेलं नाही.

**सबस्टेशन प्रस्तावित करण्याची मागणी**

**केळवे पूर्व भागात टेक्स्टाइल पार्कबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत महावितरणकडून टोकराळे येथे २५० मेगावॉटचे २२० x ३३ केव्हीचे सबस्टेशन प्रस्तावित करण्याची मागणी केल्याची माहिती सूत्रांनी दिली.**




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी